# सर्वसाधारण सभा दिनांक १७.०७.२०१५ रोजीचे कार्यवृत्त

## भाग-१

जिल्हा परिषद, सर्वसाधारण सभा डॉ. पंजाबराव देशमुख सभागृह, जिल्हा परिषद, अमरावती येथे दिनांक १७.०७.२०१५ रोजी दुपारी १.०० वाजता आयोजित करण्यात आली. मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद, अमरावती यांनी आजचे सभेला उपस्थित सन्मा. उपाध्यक्ष श्री. सतीश हाडोळे, सन्मा. सभापती, बांधकाम व शिक्षण श्री. गिरीष कराळे, सन्मा. सभापती महिला व बाल कल्याण सौ. वृषालीताई विघे, सन्मा. सभापती कृषी व पशुसंवर्धन सौ. अरुणाताई गोरले, सन्मा. सभापती समाजकल्याण सौ. सरीताताई मकेश्वर सन्मा. जिल्हा परिषद सदस्य, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व), पत्रकार व उपस्थित अधिकारी वर्ग यांचे सभेच्या उपस्थिती निमित्ताने स्वागत केले व सचिव तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) यांना सभा सुरु करण्यास अनुमती दिली.

लॉस एंजील येथे होणाऱ्या स्पेशल ऑलिम्पिकच्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा कॅलिफोर्निया (अमेरिका) २०१५ येथे होणाऱ्या क्रीडा स्पर्धेत भारतीय फुटबॉल संघात निवड झाल्याबद्दल मंदबुध्दी व शारीरिक अंपग विद्यालय, हर्षराज कॉलनी, अमरावती येथील स्टार खेळाडु जुमेद खान सलीम खान यांचा शाल, श्रीफळ देऊन मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद, अमरावती यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

**<u>विषय क्रमांक १</u> :- जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दि.२७ एप्रिल २०१५ चे सभेचे कार्यवृत्त भाग-१ वाचुन कायम करणेबाबतचे विषयाचे वाचन सचिव तथा उप मु.का.अ.(सा) यांनी केले व या विषयावर सभागृहामध्ये खालीलप्रमाणे चर्चा होऊन सर्वानुमते मंजुरात प्रदान करण्यात आली.**

**<u>मा.सौ.सुरेखाताई ठाकरे, सदस्या</u> :-** २५१५ अंतर्गत सोनोरी येथील अंबादेवी संरक्षण भिंत बांधकाम हे काम बदल करुन त्याऐवजी चिंचोली काळे येथील सिमेंट कॉक्रींट रस्ता बांधकाम करणे असा बदल करण्याबाबत इतिवृत्तात नमुद आहे परंतु सोनोरी येथील कामाची प्रशासकीय मान्यता झालेली असल्यामुळे या कामात बदल करण्यात येऊ नये व चिंचोली काळे येथील कामाकरीता वेगळी तरतुद करण्यात यावी.

**<u>मा.श्री.प्रताप अभ्यंकर, सदस्य</u> :-** हरम येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे काम एनआरएचएम मधुन मंजुर होते व या कामावरील एनआरएचएमचा निधी वळती करण्यात आला आहे. परंतु हरम येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला कम्पाउंड वॉल व जाणाऱ्या रस्त्याची आवश्यकता असल्यामुळे एनआरएचएम वरील निधी या कामावर वळती करण्यात यावा.

**<u>मा. श्री. अभिजीत ढेपे, सदस्य</u> :-** भाग १ व भाग २ मंजुर करतांनी संबंधित सर्व विभागाचे अधिकारी आजच्या सभेला हजर आहेत काय? पीएमजीएसवायचे अधिकारी हजर आहेत काय? कृती आराखडा त्यांनी मंजुर करुन घेतला. परंतु प्रत्येक सन्मा. सदस्यांच्या मतदारसंघातील कोणती कामे मंजुर केली याची माहिती त्या संबंधित सन्मा. सदस्यांना देण्यात आली आहे काय? याबाबत माहिती देण्यात यावी.

**<u>मा. सभापती (बांधकाम व शिक्षण)</u> :-** पीएमजीएसवाय हा जिल्हा परिषदेचाच भाग आहे. त्यामुळे जिल्हयात पीएमजीएसवाय अंतर्गत किती कामे मंजुर आहेत? व त्यापैकी किती सुरु आहेत? याबाबत वेळोवेळी सबंधित सन्मा. सदस्यांना माहिती देणे आवश्यक आहे.

**का.अ.(पीएमजीएसवाय) :-** टप्पा १० अंतर्गत पुलाचे कामे सुरु झालेली आहेत. मेळघाटातील एका पुलाचे काम व्हायचे आहे. टप्पा २ मध्ये रु. १९.०० कोटींची कामे असुन सदर निधी अप्राप्त असल्यामुळे कामे बंद आहेत. मा. लोकप्रतिनिधींची कामे मंजुर करुन घेतली आहेत.

**मा.श्री. रविंद्र मुंदे, सदस्य :-** मागील वर्षीचे पीएमजीएसवायचे उत्पन्न रु. १.०० कोटी आहे. मग हा निधी जिल्हा परिषदेच्या जिल्हा निधीत का जमा केल्या जात नाही तो निधी केंद्र शासनाकडे का जमा करण्यात येतो?

**का.अ.(पीएमजीएसवाय) :-** recovery ही महसुल विभागाकडुन जमा करण्यात येतो व ती सरकारी खात्यातच जमा करण्यात येते. तसेच हा निधी जिल्हा परिषदेच्या निधीत जमा करावयाचा असेल तर याबाबत शासनाची परवानगी घ्यावी लागेल.

**मा.मु.का.अ. :-** १० ते १२ वर्षापासुन जिल्हा परिषदेकडे पीएमजीएसवाय होते. परंतु आता पीएमजीएसवाय ही स्वायत्त संस्थाआहे. कामाच्या दर्जाबाबत (quality) पीएमजीएसवायचे नाव आहे. आपल्या जिल्हा परिषदेला शेअर्स मिळावा म्हणुन या सभागृहाचा ठराव घ्यावा लागेल.

**मा. अध्यक्ष :-** पीएमजीएसवाय हा एक जिल्हा परिषदेचाच भाग असल्यामुळे या अंतर्गत प्राप्त उत्पन्नामध्ये जिल्हा परिषदेला शेअर्स मिळावे याबाबत आजचे सभेचा ठराव मंजुर करण्यात येत आहे. याबाबत शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा.

**मा.सौ.सुरेखाताई ठाकरे, सदस्या :-** जिल्हयात सध्या कोरडया दुष्काळाचे सावट सुरु आहे. दुबार पेरणीची वेळ आलेली आहे. म्हणुन कोरडा दुष्काळ जाहीर करण्याबाबत आजचे सभेत ठराव घेण्यात यावा. शासनाकडुन दुबार पेरणीकरीता शेतकऱ्यांना काय मदत मिळु शकते हे सध्या फार महत्वाचे आहे. जिल्हा परिषद ही ग्रामीण भागासाठी असल्यामुळे ग्रामीण जनतेचा विचार या ठिकाणी निश्चितच व्हायला पाहिजे. म.रा.वि.वि. कंपनीचा व्हाल्टेजचा प्रॉब्लेम असल्यामुळे शेतीसाठी शेतकऱ्यांना पाणी मिळु शकत नाही. या ठिकाणी जिल्हा बँकेचे अध्यक्ष मा.श्री. अनिरुध्द उर्फ बबलुभाऊ देशमुख हे सुध्दा उपस्थित आहेत. म्हणुन अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील आपल्या जिल्हा परिषदेच्या ठेवीवर किती व्याज प्राप्त झाले आहे? यामधुन शेतकऱ्यांना आपण काही मदत करु शकतो? याबाबतसुध्दा कोठेतरी विचार झाला पाहिजे. राज्यस्तरच्या कृषी विभागाकडुन राबविण्यात येणाऱ्या योजनांची शेतकऱ्यांना काय फायदा होऊ शकतो? आरसी पेक्षा खुल्या बाजारात चांगली वस्तु कमी भावात मिळत असेल तर याबाबत अंमलबजावणी कृषी विभागाकडुन का केली जात नाही? एमएसएसआयडीसी कडुन खरेदी का करण्यात येत नाही?

**मा. अध्यक्ष :-** सर्वप्रथम विषय सुचीवरील विषय घेण्यात येणार आहेत व नंतर या विषयावर चर्चा करु.

**मा.सौ.सुरेखाताई ठाकरे, सदस्या :-** विषय सुचीवरच प्रथम हा विषय असायला पाहिजे होता. हे सभागृह डॉ. पंजाबराव देशमुखांच सभागृह आहे व जनतेच्या व शेतकऱ्यांच्या हिताचे प्रश्न येथे मांडल्या गेले पाहिजे. विषय सुचीवरील विषय सुध्दा घेण्यात यावे परंतु महत्वपुर्ण बाबीला प्रथम प्राधान्य द्यायला पाहिजे. २२ सेंटर सिंगल फेजचे आहेत. त्यामुळे ग्रामीण जनतेला फक्त ८ तास विद्युत मिळते यासारख्या गोष्टींकडे प्रथम प्राधान्याने लक्ष द्यायला पाहिजे. दिनदयाळ योजने अंतर्गत मराविवि कंपनीकडे निधी येऊन पडलेला आहे. एमएसईबीने निविदा प्रक्रिया करुन गाव निहाय फिडर योजना कार्यान्वीत करायला पाहिजे व याबाबत मा. पालकमंत्री महोदय यांचेकडे साकडे घालुन पाठपुरावा केला पाहिजे.

**उप का.अ.(मराविविकं) :-** दिनदयाळ योजना अंतिम टप्प्यात असुन निविदा प्रक्रिया प्रक्रियेत आहे.

**मा.सौ.सुरेखाताई ठाकरे, सदस्या :-** निविदा प्रक्रिया प्रक्रियेत आहे म्हणजे नेमकी याबाबत आजची स्थिती काय आहे? किती दिवसात होईल ते सांगावे?

**उप का.अ.(मराविविकं) :-** निविदा प्रक्रिया होऊन १५ दिवसात काम सुरु करण्यात येईल.

**मा.सौ.सुरेखाताई ठाकरे, सदस्या :-** अशा प्रकारे काम होत असेल तर या ठिकाणी अभिनंदन करण्यात येत आहे.

**मा. श्री. अभिजीत ढेपे, सदस्य :-** सन्मा. सदस्या सौ. सुरेखाताई ठाकरे यांनी सुचविल्याप्रमाणे जिल्हयात सध्या कोरडया दुष्काळाचे सावट आहे. दुबार पेरणीची वेळ आलेली आहे. म्हणुन कोरडा दुष्काळ जाहिर करण्याबाबत प्रथम ठराव घेण्यात यावा.

**मा. अध्यक्ष :-** अमरावती जिल्हयामध्ये कोरडा दुष्काळ जाहीर करण्याबाबत आजचे सभेत ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**विषय क्रमांक २ :- शासनाकडुन प्राप्त परिपत्रकांचे वाचन करणे.**

**शि.अ.(प्राथ) :-** प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची राज्यामध्ये शैक्षणिक वर्ष सन २०१५-१६ पासुन अंमलबजावणी करणेबाबत शासन निर्णय क्रमांक : शैगुवि २०१५(८०/१५)/एस.डी.६, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई दि.२२ जून, २०१५ चे सभागृहात वाचन करण्यात आले.

**मा. श्री. अभिजीत ढेपे, सदस्य :-** लोकप्रतिनिधींचा सहभाग घ्यावा असे या शासन निर्णयात नमुद आहे काय?

**शि.अ.(प्राथ) :-** लोकप्रतिनिधींचा सहभाग घ्यावा असे या शासन निर्णयात नमुद नाही.परंतु लोकसहभागातुन योजना राबविण्यात यावी अशी माझी इच्छा आहे.

**शि.अ.(प्राथ) :-** राज्यातील शाळांमध्ये वृक्षारोपणाची योजना राबविण्याबाबत शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण १११५/प्र.क्र.२५५/एस.एम.१, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई दि.१५ जुलै, २०१५ चे सभागृहात वाचन करण्यात आले.

**मा.श्री. रविंद्र मुंदे, सदस्य :-** जिल्हा परिषदेच्या शाळेत जिल्हा परिषदेचे शिक्षक असतात. त्यांचेवर मॉनीटरींग करण्याचे काम गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक यांचे आहे. मग वैद्यकिय चाचणी करण्याचे काम कोणाचे आहे?

**मा.श्री. प्रताप अभ्यंकर, सदस्य :-** ग्रामीण भागात सध्या मजुरांना काम नाही, दुष्काळी परिस्थती आहे असे विदारक चित्र असतांना रक्त गटांबाबत माहिती मागविण्यात येत आहे. हे रक्तगट काढण्याकरीता ग्रामीण भागातुन शहरात येण्याकरीता रु. १००/- खर्च येतो व शहाराच्या ठिकाणी लॅबमध्ये गर्दीसुध्दा आहे. आदिवासी भागात तर यापेक्षा भयानक परिस्थिती आहे. म्हणुन ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उप केंद्रांवर याबाबतची किट पुरविण्यात यावी.

**मा.श्री. अनिरुध्द उर्फ बबलुभाऊ देशमुख, सदस्य :-** सन्मा. सदस्य यांनी सुचविल्याप्रमाणे ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उप केंद्रांवर याबाबतची किट उपलब्ध करुन देऊ शकतो काय?